ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख ६ ऑक्टोबर, १९५४ | अंक ३९

## विविध माहिती

**शाळांतून रेडिओची सोय**—हैद्राबाद राज्यांतील १५० हायस्कुलांतून १९५४ च्या नोव्हेंबरपर्यंत रेडिओची सोय करण्यांत येणार आहे. राज्य सरकारच्या शिक्षण-खात्यानें अखिल भारतीय रेडिओवरून प्रक्षेपित होणारे शालेय कार्यक्रम विद्यार्थ्यांनीं ऐकलेच पाहिजेत, असा हुकूम काढला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यानें रेडिओसाठी १ रुपया वर्गणी द्यावयाची आहे.

**हैद्राबाद सरकारला कर्ज**—हैद्राबाद राज्यांतील दुष्काळी भागांना मदत करण्यासाठी म्हणून भारतीय सरकारनें राज्य सरकारला ३ कोटी रुपयांचें दीर्घ मुदतीचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्ज ३० वर्षांत परत करावयाचें आहे. एकूण रकमेपैकीं ३६ लाख रुपये रक्कम दुष्काळी भागांतील जमिनींची धूप थांबविण्यासाठीं खर्च करण्यांत येणार आहेत.

**विद्यार्थ्यांचीं श्रमदान शिबिरें**—शारीरिक श्रमाची महती विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी पुणें विद्यापीठाच्या कोर्टानें श्रमदान-शिबिरें उघडण्याचें ठरविलें आहे. श्रमदानाचें शिक्षण देणारीं १० केंद्रें खोलण्यांत येणार आहेत. तीं १० दिवस चालतील. पुण्यांतील व पुण्याबाहेरील कॉलेजांतील विद्यार्थी शिबिरांत शिक्षण घेतील. भारतीय सरकार निम्मा खर्च देणार आहे.

**गुरांच्या डॉक्टरांची जरूरी आहे**—भारतांत सध्यां गुरांच्या डॉक्टरांची टंचाई भासत आहे. समाज-विकास-योजना आणि नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिस सुरू झाल्यापासून ही टंचाई विशेष जाणवू लागली आहे. कित्येक राज्यांतून गुरांच्या डॉक्टरांची वाण भासत आहे. ह्या डॉक्टरांना आपण नोकरीची हमी देण्यास तयार असल्याचें डॉ. पंजाबराव देशमुख ह्यांनीं लोकसभेंत सांगितलें.

**गंगा नदीमुळें जमिनीचा नाश**— बिहारमधील मोंघीर जिल्ह्यांत गंगा नदीचें पात्र कित्येक ठिकाणीं जमीन वाहून नेत आहे. गेल्या महिन्यांत नदीच्या पात्रानें सुमारें २,००० बिघे जमीन व्यापली आणि ३०० घरें जमीनदोस्त केलीं. कांहीं ठिकाणीं पात्र परत पहिल्यासारखें मागें सरकलें तरी माती वाहून गेल्यामुळें ही जमीन पिकाला योग्य रहाणार नाहीं.

**नर्सची महाराणी व महाराणीची पुनः नर्स**—सहा वर्षांपूर्वी मिस मॅकब्राइड ह्या एका नर्सची व जोधपूरचे महाराज, प्रिन्स हनुमंतसिंग, ह्यांची दिल्ली येथील एका पार्टीत वेळीं गांठ पडली. कांहीं महिन्यांनीं ते दोघे विवाहबद्ध होऊन, नर्सचें महाराणींत रूपांतर झालें. दोन वर्षांनंतर, महाराजांचें खासगी विमान कोसळून त्यांत ते मरण पावले. त्यांची ही महाराणी विधवा झाली. तिनें बर्मिंगहॅम येथील इस्पितळांत आतां काम पत्करलें असून, ती पूर्ववत नर्स बनली आहे.

**दारूबंदीचा सुपरिणाम**—मेहसाणा जिल्ह्यांतील पाटण ह्या गांवीं मोहन मोती नांवाचा एक हरिजन रहात असे. दारूबंदी पूर्वी तो दारू पीत असे व त्यामुळें तो फारसें काम करूं शकत नसे. दारूबंदी झाल्यापासून त्यानें दारू सोडली. नंतर तो रोज ३ ते ४ रुपये मिळवूं लागला. त्यानें आपल्या घरावर ३०० रुपये कर्ज काढलें होतें. दरमहा दहा रुपये फेड करून आतां त्यानें कर्ज फेडीत आणलें आहे.

**खेळाडूंना मिळणारा भत्ता**—इंग्लंड विरुद्ध ऑस्ट्रेलिआ ह्यांच्या दरम्यान जे क्रिकेटचे सामने व्हावयाचे आहेत त्यांत ऑस्ट्रेलिआतर्फे खेळणाऱ्या खेळाडूंचे भत्ते प्रत्येक मॅचसाठी ६४ पौंड करण्यांत आले आहेत. ही रक्कम रुपयांत सुमारें ८३२ रुपये होते. कसोटीच्या खेळांत पंचाचें काम करणाऱ्यांचे भत्तेहि वाढविण्यांत आले आहेत.

**फर्स्ट क्लास रद्द होणार**—भारतीय रेल्वे मार्गांवर १९५५ च्या एप्रिल पासून पहिला वर्ग रद्द करण्यांत येणार आहे. सध्यां १३ गाड्यांतून पहिल्या वर्गानें प्रवास करणारांची सोय आहे. ह्या गाड्यांवर ३१ मार्च, १९५५ ला पहिल्या वर्गाचे डबे जोडले जातील ते अखेरचेच.

**लग्न करणाऱ्यांची गर्दी**—दक्षिण आफ्रिकन सरकारनें येत्या नोव्हेंबरपासून नव्या भारतीयांना दक्षिण आफ्रिकेंत कायमचे रहाण्यास बंदी करण्याचें ठरविलें आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, द. आफ्रिकेंत रहाणारे हिंदी नागरिक भारतांत येऊन भराभरा लग्नें करीत आहेत. हुंडा अगर मुहूर्त ह्यांचीहि ते पर्वा करीत नाहींत. गुजराथमधील खेडा जिल्ह्यांत अशीं घाईचीं लग्नें खूपच होत आहेत. लग्नें झाल्यावर हे लोक सहकुटुंब आफ्रिकेंत जातात.

**गुजरात सहकारी परिषद्**—अखिल गुजरात सहकारी सोसायट्यांच्या परिषदेचें अध्यक्षस्थान श्री. वैकुंठराय मेहता हे स्वीकारणार आहेत. परिषद् द्वारका येथें १५ व १६ नोव्हेंबर रोजीं भरणार आहे.

**मुंबई राज्य फिनान्शिअल कॉर्पोरेशन**—मुंबई राज्य फिनान्शिअल कॉर्पोरेशनकडे १·५३ कोटी रु. कर्जासाठी १०० अर्ज आलेले आहेत.

**शेतीच्या शाळांसाठी जमीन**—ज्या शेतीच्या शाळांजवळ चार बैल असतील आणि यांत्रिक पद्धतीनें पाणी उपसण्याची सोय असेल, त्या शाळांना निदान ३० एकर तरी जमीन द्यावी व त्यांतील ८ ते १० एकर जमीन कुरणाची असावी, अशी सूचना मुंबई सरकारच्या ॲग्रिकल्चरल स्कूल्स कमिटीनें केली होती. मुंबई सरकारनें सूचना तत्त्वतः मान्य केली आहे.

### डिपॉझिट इन्शुअरन्सच्या योजनेच्या विचारास अवकाश आहे

श्रॉफ कमिटीनें बँकांतील ठेवींच्या विम्याची योजना आखण्यांत यावी अशी शिफारस केली होती; रिझर्व्ह बँकेनें बँकांना लायसेन्स देण्याचें काम पुरें केल्यानंतरच ह्या शिफारसीचा विचार करतां येईल असें उप-अर्थमंत्री श्री. गुहा ह्यांनीं राज्यसभेंत सांगितलें. बँकिंग कंपन्यांच्या कायद्याप्रमाणें, लायसेन्स देण्याचें काम अद्याप पुरें झालेलें नाहीं. त्याला वेळ लागत आहे ह्याचें कारण, रिझर्व्ह बँकेनें २८९ बँकांकडून माहितीचे त्रैमासिक तक्ते व २० बँकांकडून मासिक तक्ते मागविले आहेत. त्यांच्या कारभाराबद्दल खात्री होईपर्यंत त्यांना लायसेन्स देणें शक्य होणार नाहीं.

### चिनी कोट्याधीश

हॉंगकॉंग येथील एक कोट्याधीश चिनी ऑ बूनहॉ ७२ व्या वर्षी नुकतांच मरण पावला. जपानविरुद्ध चँग कै शेकनें चालविलेल्या लढ्यासाठी यानें एकट्यानें २ कोट रुपयांची मदत केली होती. याशिवाय शाळांच्या इमारती व हॉस्पिटलें बांधणें व इतर दानधर्मासाठी मिळून यानें एकूण १० कोटि रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. 'टायगर बाम' नांवाचें एक पेटंट औषध, हॉटेल्स व वर्तमानपत्रें चालविणें, या धंद्यांवर त्यानें आपली ही जगडव्याळ संपत्ति निर्माण केली होती.

### फिनॅन्स कॉर्पोरेशन्सची परिषद्

वेगवेगळ्या राज्यांत स्थापन झालेल्या फिनान्स कॉर्पोरेशन्सच्या प्रतिनिधींची एक परिषद् रिझर्व्ह बँकेनें भरविली होती. ह्या कॉर्पोरेशन्सना पहिलीं पांच वर्षें प्राप्तीकर माफ असावा व स्टँपड्यूटी त्यांना यावी लागू नये, अशा सूचना परिषदेनें केल्या आहेत. सध्यां आठ राज्यांनीं फिनान्स कॉर्पोरेशन्स स्थापन केल्या आहेत. प्रत्येकीचें वसूल भांडवल १ कोटी रु. असून त्यापैकीं ५०% राज्य सरकारनें, १५% रिझर्व्ह बँकेनें व ३५% विमा कंपन्या, बँका व नागरिक ह्यांनीं दिलेलें आहे. कॉर्पोरेशन्सच्या शेअर्सवरील डिव्हिडंडला हमी आहे, पण नफा सुटूं लागण्यास थोडा अवधी लागणें स्वाभाविक आहे.

### रिकाम्या नट-नटयांना कारखान्यांत रोजगार

ग्रेट ब्रिटनमधील कित्येक नट व नटया ह्यांनीं लंडनमध्यें एक कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. ज्यांना काम नसेल, असे नट व नटी नवीन काम मिळेपर्यंत ह्या कारखान्यांत रोजंदारी करूं शकतील. दर आठवड्याला त्यांना १२५ रु. रोजगार मिळेल. त्यामुळें बेकारीच्या दिवसांत शिलकी बचतीस त्यांचा हात लागणार नाहीं. बड्या उद्योगपतींना नियोजित कारखान्याचें संचालकत्व स्वीकारण्याची विनंति करण्यांत येत आहे. लंडन येथील एका जुन्या चर्चमध्यें हा कारखाना चालू करण्यांत येईल. स्पीडोमीटर्स व रेडिओचे सुटे भाग जुळविण्याचें काम कारखान्यांत केलें जाईल.


कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८ ★ किंमत २॥ रु.


" आपल्या लेखांत दैनंदिन जीवनांतील साध्या साध्या गोष्टी घेऊन, त्यांतून महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं सुखी जीवनाची किल्लीच जणुं काय प्रत्येकाच्या हातांत दिली आहे. "

ग. वा. मावळंकर
लोकसभेचे अध्यक्ष

( " कण आणि क्षण " च्या गुजराती आवृत्तीच्या प्रस्तावनेंतील उतारा. )

किर्लोस्कर पॉवरवर चालणारा 'शरद' चरक

हा चरक चालविण्यास ८।१० हा. पा. एंजिन लागते. दरेक तासास १२०० ते १५०० पौंड ऊंस गाळला जातो. याशिवाय बैलावर चालणारे कमाल, करामत व पॉवरवर चालणारे कोयना, वसंत, वगैरे चरक आहेत. पसंतीप्रमाणें निवड करा.




—सविस्तर माहितीसाठीं लिहा.—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.


फोन नं. ३२१५
तार-SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ६ ऑक्टोबर, १९५४


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## महाराष्ट्रांतील बँकिंग

दि डेक्कन बँक्स असोसिएशन व दि पूना बँकिंग असोसिएशन ह्यांनीं "बँकिंग इन् महाराष्ट्र" हें पुस्तक तयार केलें, त्याचा प्रकाशन-समारंभ महसूल मंत्रि, श्री. भाऊसाहेब हिरे, ह्यांच्या हस्तें दि. २ रोजीं झाला. महाराष्ट्र विभागांत काम करणाऱ्या जॉइंट स्टॉक व सहकारी बँकांबाबत सर्व तऱ्हेचे आकडे त्यांत एकत्रित करण्यांत आलेले आहेत, आणि तुलनेसाठीं भारतीय बँकांचे आकडेहि दिलेले आहेत. महाराष्ट्रांत बाहेरील मोठ्या बँकांच्या, मुंबई राज्य सहकारी बँक वगळली तरी, सुमारें ७५ शाखा असून त्यांचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. महाराष्ट्रीय नियंत्रणाखालील बँकांपेक्षा ह्या बँकांची देवघेव व उलाढाल किती-तरी मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु, त्याबाबत स्वतंत्र आकडे उपलब्ध नसल्या कारणानें ते पुस्तकांत देतां आलेले नाहींत. महाराष्ट्रीय नियंत्रणाखालील जॉइंट स्टॉक बँकांच्या व्यवहारांचे मानानें सहकारी बँकांचे व्यवहार अधिक मोठे आहेत; त्यांचेकडे ज्यास्त ठेवी आहेत, त्यांची रोख्यांतील गुंतवणूक ज्यास्त आहे, आणि त्यांनीं दिलेलीं कर्जें तर कितीतरी ज्यास्त आहेत. बँक अवार्ड भारतांतील सुमारें २०० बँकांना लागू आहे, त्यांत फक्त दोनच महाराष्ट्रीय बँका आहेत, ही गोष्ट उद्बोधक आहे.

महाराष्ट्रांतील जॉइंट स्टॉक बँकांपुरतें पाहिलें, तर त्यांत ८ शेडयूल्ड व २० बिगर-शेडयूल्ड आहेत. शेडयूल्ड बँकांच्या १२१ व बिगर-शेडयूल्ड बँकांच्या ७३, अशा एकूण १९४ शाखा आहेत. त्या सर्वांचें मिळून वसूल भाग-भांडवल १,१७,१५,००० रु. आहे व त्यांचे रिझर्व्ह फंड ३७,४२,००० रु. चे आहेत. भारतांतील सर्व बँकांचे मिळून तत्सम आकडे अनुक्रमें ४१,८८,००,००० रु. व ३१,४०,००,००० रु. असे आहेत. म्हणजे, त्यांचे रिझर्व्ह फंड वसूल भांडवलाची बरोबरी करण्याच्या मार्गावर आहेत. एकूण त्यांच्या ठेवींच्या मानानें मात्र महाराष्ट्रीय बँकांचें स्वतःच्या मालकीचें भांडवल ( वसूल भांडवल + रिझर्व्ह ) जास्त आहे. हें प्रमाण १३% पडतें; अखिल भारतीय तत्सम प्रमाण ७·५६% आहे. ह्याचा अर्थ, एका दृष्टीनें महाराष्ट्रीय बँकांचा व्याप स्वतःच्या भांडवलाच्या मानानें अधिक आटोपशीर आहे, तर दुसऱ्या दृष्टीनें इतर ठिकाणच्या बँका त्यांचेजवळील पैसा अधिक वापरून जास्त नफा मिळवून देतात. महाराष्ट्रीय बँकांतील ठेवींत चालू ठेवींच्या मानानें मुदती व सेव्हिंग्ज ठेवी अधिक आहेत; त्यामुळें त्यांना जास्त दरानें व्याज द्यावें लागतें.

महाराष्ट्रीय बँकांची व त्यांच्या कचेऱ्यांची संख्या एकूण ठेवींच्या मानानें ज्यास्त भरत असल्यामुळें आणि पैसा इकडून तिकडे पाठविण्याच्या सोईचा अभाव असल्याकारणानें, त्यांनीं रोख व बँकांत मिळून १८·५% रक्कम बाळगलेली आहे. अखिल भारतीय तत्सम प्रमाण १२·८६% आहे. ह्या जादा रोकडीचे आधारावर महाराष्ट्रीय बँका आणखी सुमारें ३० लक्ष रु. कर्जाऊ देऊन दीड लक्ष रुपये नफा मिळवूं शकल्या असत्या. १९५३ सालीं सर्व महाराष्ट्रीय बँकांनीं मिळून ३,८२,००० रु. डिव्हिडंड वाटलें. ह्या रकमेचे मानानें ही दीड लक्ष रुपयांची भर कितीतरी मोठी आहे. २८ महाराष्ट्रीय बँकांपैकी एक कोटीपेक्षा ज्यास्त ठेवी असलेल्या फक्त ५ बँका आहेत; आणि फक्त २ बँकांच्या महाराष्ट्राबाहेर शाखा—त्याहि थोड्याच—आहेत. महाराष्ट्रांतील कित्येक बँका कितीतरी जुन्या आहेत, परंतु इतर ठिकाणच्या बँकांच्या मानानें त्यांची वाढ होऊं शकलेली नाहीं.

ह्या सर्वांचा अर्थ असा नव्हे, कीं महाराष्ट्रीय बँका व बँकर ह्यांच्या प्रयत्नांत कसूर झालेली आहे. महाराष्ट्रांतील आर्थिक परिस्थितीचा तो परिणाम आहे; येथील शेतीच्या निकृष्टावस्थेचें व औद्योगिक मागासलेपणाचें तें लक्षण आहे. व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत स्थानिक प्रजाजनांचा जेवढा हात असेल, त्याच्या कांहीं लहान प्रमाणांतच स्थानिक बँकांकडे त्यांचें काम येणार. परठिकाणच्या मोठ्या व्यापारी बँकांना त्यांच्या मोठ्या भांडवलाचा, व्यापाचा, हितसंबंधांचा व अनुभवी अधिकाऱ्यांचा फायदा मिळतो; तसा स्थानिक बँकांना मिळण्याजोगी अद्याप परिस्थिति सुधारलेली नाहीं. कित्येक महाराष्ट्रीय विमाकंपन्यांना अखिल भारतांत जेवढें काम मिळतें, तितकें काम परठिकाणच्या मोठ्या कंपन्या महाराष्ट्रांतील एकेका शहरांतून काबीज करतात, हेंसुद्धां तीच गोष्ट सिद्ध करते. अशाहि प्रतिकूल परिस्थितींत, महाराष्ट्रीय बँकांनीं नेटानें आपलें पाऊल टाकलें आहे. त्यांच्यांत अधिक प्रभावी सहकार्य घडून आलें, तर महाराष्ट्रीय बँकिंगची प्रगति जास्त जोमानें घडून येईल ह्यांत संशय नाहीं.

---

## जागतिक बँकेला प्रतिस्पर्धी निर्माण झाला

### अविकसित देशांचा फायदा

"अविकसित देशांना कर्ज देण्याच्या व्यवहारांत जागतिक बँकेला लवकरच तीव्र स्पर्धा सहन करावी लागणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. जागतिक बँकेनें देऊं केलेलें पौंडांच्या स्वरूपांतील कर्ज नाकारल्याचें उदाहरण भारतांत नुकतेंच घडलें आहे. जागतिक बँकेचा ५% हा व्याजाचा दर फार भारी वाटला, असें समजतें. इतर ठिकाणीं ह्यापेक्षा स्वस्त दरानें कर्ज मिळूं शकतें, ही भारताची कल्पना खरी ठरली तर जागतिक बँकेला जरा गंभीरपणेंच विचार करावा लागेल" असें मत फिनॅन्शिअल टाइम्स ह्या ब्रिटिश पत्रानें दि. २७ सप्टेंबर रोजीं व्यक्त केलें आहे.

ह्या प्रतिस्पर्ध्याचा सुगावा राज्यसभेंतील प्रश्नोत्तराचे वेळीं, दि. २८ रोजीं, लागला. भारतांत पोलादाचा नवा कारखाना उभारण्या-साठीं अगदीं कमी व्याजाच्या दरानें बरेंच मोठें कर्ज रशिआनें देऊं केलें आहे व रशियन यंत्रज्ञ कारखाना उभारूनहि देणार आहेत, अशी माहिती पं. नेहरूंनीं सांगितली. येत्या नोव्हेंबरांत रशियन तज्ञ भारतांत येऊन प्राथमिक काम पुरें करणार आहेत. "कर्जावरील व्याजाचा दर २½% राहील हें वृत्त खरें आहे काय?" ह्या प्रश्नास, "नक्की व्याजाचा दर माझ्या लक्षांत नाहीं" असें पं. नेहरूंनीं सांगितलें.

# आदर्श तत्त्वानुसार चालविलेल्या सर्व बँकांना योग्य वाव पाहिजे

## महाराष्ट्रीय बँकांच्या परिषदेचे अध्यक्ष, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचें भाषण

बँकिंग हा केवळ धंदा किंवा पेशा नसून ती एक राष्ट्रीय व सामाजिक सेवा आहे. बँकांचें मुख्य कार्य म्हणजे जनतेकडून लहान लहान रकमा गोळा करून एकत्र करावयाच्या व त्यांचा उपयोग देशांतील शेती, व्यापार व उद्योगधंदे यांच्या प्रगतीसाठी करावयाचा. महाराष्ट्रांतील कार्यकर्ते, मग ते कोणत्याहि क्षेत्रांत कार्य करीत असोत, त्यांच्या ठिकाणीं नेहमींच हेतूची सचोटी हा गुण वैशिष्ट्यपूर्ण दिसून येतो. आपल्यापैकीं कांहीं बँकांच्या बाबतींत कारभाराच्या कांहीं किरकोळ चुका असतील अगर कांहींच्या बाबतींत घेतलेले निर्णय चुकीचेहि ठरलेले असतील, तथापि वरील सूत्र मात्र निःसंशय कायम आहे. भारताच्या आर्थिक नियोजनांत बँकांना फार महत्वाचें स्थान आहे, व आपण सर्व या बाबतींत आपल्या पुढाऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल असा मी विश्वास बाळगतों.

देशांत जर बँकिंगची पद्धतशीर प्रगति व्हावयास हवी असेल तर त्याकरितां कांहीं एका निश्चित स्वरूपाच्या धोरणाची व नियोजनाची आवश्यकता आहे. या संबंधांत रिझर्व्ह बँक अगर मध्यवर्ती सरकार या जबाबदार घटकांनीं अद्याप कांहींच निश्चित धोरण ठरविलेलें नाहीं व त्यामुळें या क्षेत्रांत कामें करणारांना योग्य मार्गदर्शनाच्या अगर धोरणाच्या अभावीं परिस्थितीशीं झगडत केवळ स्वतःच्या मार्गानें, परिस्थित्यनुरूप, जाणें भाग पडत आहे. आपल्याकडे युनायटेड किंगडमप्रमाणें देशव्यापी शाखांचें जाळें असणाऱ्या थोड्याशा बँका असाव्यात, किंवा अमेरिकेप्रमाणें प्रांतनिहाय किंवा जिल्हानिहाय बँका असाव्यात याबाबत सरकारनें अगर रिझर्व्ह बँकेनें अद्याप कांहीं निश्चित धोरण प्रकट केलेलें नाहीं. आपल्या देशांत खेड्यांची संख्या फार आहे व निरनिराळ्या थरांतील लोकांचें उत्पादनाचें मानहि सारखें नाहीं. अशा स्थितींत वर निदर्शित केलेल्या सूत्ररूप धोरणाची फारच आवश्यकता आहे व रिझर्व्ह बँक अगर मध्यवर्ती सरकार यांनीं तें प्रकट करावें अशी माझी आग्रहाची सूचना आहे. म्हणजे, या क्षेत्रांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्याच्या अनुरोधानें आपला कार्यक्रम ठरविणें व तो अमलांत आणणें सुलभ होईल. आज अशा धोरणाचा अभाव आहे, इतकेंच नव्हे तर आजचें रिझर्व्ह बँकेचें धोरण हें पंक्तीप्रपंचाचें व मोठ्या बँकांना अनुकूल असें आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील बँकांना आपला पुढील कार्यक्रम अगर धोरण ठरविणें अगर तें अमलांत आणणें याबद्दल निश्चितता बाळगतां येत नाहीं.

आधींच प्रांतिक किंवा स्थानिक बँकेची शाखा असलेल्या ठिकाणीं मोठ्या बँकांना शाखा काढणेस परवानगी दिली जाते व त्यामुळें तेथील बँकेची पातळी सुधारण्यास मदत होईल असें सांगितलें जातें. पण, उलट, मोठ्या बँकेच्या शाखा असलेल्या ठिकाणीं लहान बँकेच्या शाखा करण्यास परवानगी दिली जात नाहीं, व याचें कारण म्हणून त्यामुळें अनिष्ट स्पर्धा सुरू होईल अशी भीति व्यक्त केली जाते. पण अनिष्ट स्पर्धा खरोखरच कोण सुरू करते या बाबत रिझर्व्ह बँकेच्या रिसर्च डिपार्टमेंटनें चौकशी करावी, अशी माझी त्यांना सूचना आहे. आज लहान लहान उद्योगधंद्यांची भांडवलाचे अभावीं कुचंबणा होत असता, मोठ्या बँकांनीं लहान गांवीं शाखा उघडून तेथील ठेवी गोळा करून तो पैसा शहरांतील उद्योगासाठीं अगर व्यापारासाठीं पुरविणें हें एकंदर देशांतील आर्थिक प्रगतीचे दृष्टीनें कितपत इष्ट आहे, याचा निर्णय होणें आवश्यक आहे.

शिडयूल्ड बँका व नॉन-शिडयूल्ड बँका हाहि फरक यापुढें चालू ठेवणें आवश्यक आहे काय, त्याचाहि विचार होणें जरूर आहे. रिझर्व बँक ॲक्ट झाला तेव्हां सर्वच बँकांना तिच्या नियंत्रणाखालीं आणणें शक्य न वाटल्यानें फक्त पांच लाखांपेक्षा अधिक भांडवल असणाऱ्या बँकांनाच तिच्या यादींत समाविष्ट करण्यांत आलें पण आतां बँकिंग कंपनीज ॲक्ट सर्वच बँकांना सारखा लागू असल्यानें फ्री-रेमिटन्स व इतर प्रकारच्या सवलती यांच्या संबंधांत नॉन-शिडयूल्ड व शिडयूल्ड बँका असा पंक्तीप्रपंच करण्याचें कांहींएक प्रयोजन नाहीं.

लायसेन्सड व नॉन-लायसेन्सड बँका यांच्याहि बाबतींत असाच फरक करण्यांत येतो.

वास्तविक पाहतां सध्यांच्या बँकांना धंदा चालू ठेवण्यास परवानगी देण्यांत आली आहे, त्या सर्वांना लायसेन्सेस देण्यांत आलीं पाहिजेत. पुढें इन्स्पेक्शनचे वेळीं त्यांपैकीं कांहीं बँकांचे व्यवहार अगर कार्यपद्धती समाधानकारक नसल्याचें आढळून आले तर, त्यांचे लायसेन्स रद्द करण्याची तरतूद कायद्यांत आहेच. सध्यांच्या पंक्तीप्रपंचाच्या धोरणामुळें व कांहीं बँकांना लायसेन्सेस मिळून देण्याच्या धोरणामुळें खातेदारांमध्यें अनावश्यक संशय निर्माण होतो व त्याचे अनिष्ट परिणाम घडून येतात.

मी लहान बँकांचें बाजूनें बोलतों याचा अर्थ केवळ आकाराचा लहानपणा, हेंच त्यांना संरक्षण देण्याची कसोटी असावी व अगदींच लहान, न परवडणाऱ्या, अगर योग्य प्रकारें न चालविल्या जाणाऱ्या बँकांची मला तरफदारी करावयाची आहे असें नाहीं. बँक, मग ती लहान असो अगर मोठी असो, ती बँकेच्या आदर्श तत्त्वानुसारच चालविली गेली पाहिजे व त्यांतील अनिष्ट प्रथांना कोणत्याहि प्रकारें उत्तेजन मिळतां कामा नये. कारण, बँका या लोकांच्या ठेवींचे विश्वस्त आहेत अगदीं लहान अगर आर्थिक दृष्ट्या न परवडणारे असे जे घटक असतील त्यांनीं दुसऱ्या योग्य घटकांशीं एकीकरण करावें किंवा धंदा अजीबात बंद करावा. त्यांच्या सध्याच्या अनिष्ट अवस्थेंत त्यांना धंदा चालू ठेवण्यास परवानगी देणें हें ठेवीदारांच्या व भागिदारांच्या हिताचें नाहीं.

सध्यांच्या बँकांतील मालक-मजूर वादाबद्दल मी कांहीं बोलावें अशी आपली अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. मला वाटतें सध्यांच्या या वादाच्या मुळाशीं मोठ्या बँकांतील वरिष्ठ व कनिष्ठ नोकर यांना मिळणाऱ्या वेतनांतील विषमता हेंच मूळ आहे. महाराष्ट्रांतील बँकांच्या बाबतींत अशी परिस्थिति नाहीं, असें मला वाटतें आणि बँकांना जर तडजोडीनें हा प्रश्न सोडविणेची संधि देण्यांत आली तर, मला वाटते, हा वाद तावडतोब निकालांत निघेल.

या परिषदेमुळें महाराष्ट्रांत आदर्श बँकिंगचा पाया घालण्यास मदत होईल, असा मला दृढ विश्वास वाटतो.

# भारतीय उद्योगधंद्यांचें दिव्य, भव्य व सम्यग्दर्शन

## (२)

लेखकः श्री द. बा. बर्वे, बी. ए.

दुसऱ्या लेखांत लेखकानें शहरी जीवन व ग्रामीण जीवन या विषयावर आपले विचार प्रकट केले आहेत. त्याचें म्हणणें, शहरी जीवन म्हणजे उद्योगधंद्यांच्या बळावर चाललेलें जीवन व ग्रामीण जीवन हें शेतीप्रधान व्यवसायावर चाललेलें जीवन असे दोन स्पष्ट भाग सध्यां जे पडलेले दिसतात त्यांत शहरी व ग्रामीण म्हणजे शेतकी व उद्योगधंदे यांचें निश्चित जीवन ज्यांत आहे असा तिसरा विभाग भारतांत निर्माण केला जावा. लेखकाच्या मतें ग्रामीण व शहरी जीवनामध्यें महदंतर आहे तेव्हां त्या उभयतांना जोडणारा असा तिसरा विभाग असावा. टक्केवारी हिशोबानें ६० टक्के ग्रामीण, २५ टक्के मिश्रजीवन व १५ टक्के शहरी जीवन असें झाल्यास भारतीय आर्थिक जीवनांत योग्य तें तोलमान राहील असें या लेखकाचें म्हणणें आहे.

तिसऱ्या लेखकानें **बेकारीच्या प्रश्नावर आपले विचार प्रदर्शित केले आहेत.** तो म्हणतो, शेतीच्या धंद्यांवर जास्तींत जास्त माणसें उपजीविका करीत असतात. वास्तविक सुशिक्षित बेकारांविषयीं जास्त ओरड आपण ऐकतों, याचें कारण त्यांचें दुखणें ते आपल्या विद्येमुळें जाहीर रीतीनें वेशीवर टांगू शकतात. वास्तविक राष्ट्रांतील भांडवल फार मोठ्या प्रमाणांत शेतीच्या उद्योगावर खर्च केले गेले पाहिजे म्हणजे दोन कार्यें साधतील. एकतर बहुसख्य जनतेला पैसा मिळून तिची क्रयशक्ति वाढेल व भारतांतून शेतीच्या धंद्यांत पैदा होणारा माल फार मोठ्या प्रमाणावर भारताची गरज भागवून **परराष्ट्रांत निर्यात केला जाऊन परकीय संपत्ति भारतांत येऊन आपला देश सधन होईल.** त्याशिवाय संततीनिरोधनाचें शास्त्रीय ज्ञान बहुसंख्य जनतेला अवश्य दिलें जावें व लोकसंख्येच्या भरमसाट वाढीला आळा घातला जावा, याकरतां सरकारनें अवश्य फार मोठ्या प्रमाणावर प्रचार केला पाहिजे. हजारी चाळीस अशी प्रजा अव्याहत भारतांत निर्माण होत असून जगांत कोठल्याहि देशांत इतकें मोठें जननाचें प्रमाण नाहीं. लग्नें उशिरा व्हावींत व प्रत्येक जोडप्याला तीनच्यावर मुलें नसावींच. वस्तूंचें उत्पादन वाढवावें व प्रजेच्या उत्पत्तीवर नियंत्रण या दृष्टीनें लोकमताला वळण दिलें जावें. राष्ट्रीय संपत्तीपैकी फक्त पांच टक्के भांडवलाकरतां बचत आपल्या देशांत होते व सात टक्के कर म्हणून वार्षिक राष्ट्रीय उत्पादनावर सरकारच्या तिजोरींत जातात. याचा अर्थ आपल्या देशाच्या विकासयोजनाकरतां देशामध्यें बचत होणाऱ्या भांडवलापेक्षा परकीय राष्ट्राकडून मिळविल्या जाणाऱ्या भांडवलाच्या मदतीवर आपण आपल्या देशाची आर्थिक उन्नति करणें कितपत शक्य आहे?

आपण शेअरबाजारासंबंधीं जेव्हां केव्हां कोणी उल्लेख केलेला ऐकतो तेव्हां **सध्यां 'डिफर्ड 'चा भाव काय आहे?,** ही भाषा ज्याच्या त्याच्या तोंडीं असते. हें काय गौडबंगाल आहे याची माहिती एका लेखकानें दिली आहे. डिफर्ड म्हणजे टाटा डिफर्ड. टाटा कंपनीनें सन १९०७ सालीं आपली स्टील कंपनी काढली. टाटा कंपनीनें आपल्या औद्योगिक पर्तीवर या धंद्याला सरकारकडून सालीना पन्नास लक्ष रुपयांची बाउंटी मिळविली. भारत सरकारनें टाटा कंपनीला या धंद्याच्या वाढीकरतां नुकतेंच दहा कोटी रुपयांचें अल्प व्याजावर कर्ज दिलें आहे. या टाटा कंपनीच्या डिफर्ड शेअरची मूळ किंमत फक्त तीस रुपये असून या एका शेअरवर भागीदारांना गेल्या पंधरा वर्षांत सालीना रुपये ६५ ते १७२ रु. पर्यंत नफा मिळत गेला. म्हणजे सर्वसाधारणपणें तीस रुपयांच्या मूळ किंमतीच्या एका भागावर वर्षाला शंभर रुपये नफा म्हणजे गेल्या पंधरा वर्षांत पंधराशें रुपये नफा भागधारकांना मिळाला. इतका नफा देणारी ही टाटा कंपनीची 'डिफर्ड' ही कामधेनू असल्यामुळें प्रत्येक भांडवलदार हे शेअर्स मिळविण्याकरतां धडपड करीत असे व सर्व शेअरबाजार या डिफर्डभोंवतीं फिरत असे व या शेअरला सर्व शेअर्सचा राजा म्हणण्यांत येत असे.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई.

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल व रिझर्व | रु. | ११,७०,३०० |
| ठेवी .... .... .... | रु. | १,१८,५८,४०० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,३३,१३,५०० |

शाखाः- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात

शाखाः- दादर, माहीम



शाखाः- बेळगांव, पुणें

स्थापना १९१८


**इंटर नॅशनल मोनेटरी फंड** ही आंतरराष्ट्रीय संघटना जगांतील ५५ राष्ट्रांनीं त्यांत सामील होऊन काढली असून **आपआपसांतील देणें-घेणें** प्रत्येक राष्ट्राच्या निरनिराळ्या चलनामुळें फार अवघड होत असे तें या संस्थेच्यामार्फत फार सौकर्यानें कसें होतें व तिचा उपयोग या संघटनेंतील घटकांना मोठमोठ्या रकमा कर्जाऊ त्या त्या देशांच्या पतीवर कशा मिळतात याची माहिती उत्तम प्रकारें दिली आहे.

यानंतर रिझर्व बँकेच्या नेतृत्वाखाली ग्रामीण विभागांत **बँकांचें फार मोठें जाळें पसरविण्याची केवढी मोठी आवश्यकता** आहे याची माहिती देणारा लेख आहे. सहकारी पतपेढ्यांच्या गेल्या चाळीस वर्षांच्या खटपटीनें **सात कोटींच्यावर** भांडवल उभारलें गेलें नाहीं त्याऐवजीं या नव्या योजनेनें पांच वर्षांत **पंचेचाळीस कोटी रुपये** भांडवल कसें उभारतां येण्याचा संभव आहे व त्यायोगें ग्रामीण जीवनांत भांडवली जीवन पुरविलें जाऊन देशांत सुबत्ता उत्पन्न होईल. कच्च्या मालाची पैदास भरपूर प्रमाणांत होईल, देशांतील सर्वसाधारण जनतेची क्रयशक्ति वाढेल, ठिकठिकाणीं उद्योगधंदे, विशेषतः ग्रामीण विभागांत, उभे करतां येतील, त्या विभागांतील बेकारांना काम मिळेल. ३१-१२-५२ या तारखेला शेड्यूल्ड व नॉन शेड्यूल्ड बँकांमध्यें एकूण ठेवी **६५८ कोटींच्या** होत्या. त्यांपैकीं खाजगी व्यक्तींच्या ठेवींचा आंकडा **४०९ कोटी ८२ लाख** इतका होता. औद्योगिक कंपन्यांच्या ठेवी ८० कोटींच्या व व्यापारी पेढ्यांच्या ठेवी २३१ कोटींच्या व सरकारी ठेवी १३० कोटींच्या. सरकारला १६० कोटी रुपये औद्योगिक विकासयोजनांना लागणार. बँकाबँकामधून तारांनीं व्यवहार सुरू केल्यास पडून राहिलेल्या बँकांमधील रकमा उपयोगांत येऊं शकतील. (अपूर्ण)

**आशिआमधील मेयॉर्सची परिषद्**—पुढील वर्षाच्या हिवाळ्यांत आशिआंतील मेयॉर्सची एक परिषद् कलकत्ता येथें भरणार आहे. ह्या परिषदेसाठीं कलकत्त्याचे मेयॉर श्री नरेश मुखर्जी ह्यांनीं १०० मेयॉर्सना आमंत्रणें पाठविलीं आहेत. परिषदेंत मोठ्या शहरांतील आरोग्य व साफसफाई ह्या प्रश्नांचा विचार करण्यांत येणार आहे.

### मोसंबी फळाचें महत्त्व

मोसंब्यामध्यें 'सी' व्हिटॅमिन (जीवनसत्त्व) बऱ्याच प्रमाणांत असतें. याशिवाय मोसंबीमध्यें, साखर, फॉसफरस, लोह, हीं द्रव्येंहि असतात. पोटदुखी अथवा अपचन झाल्यास, आहाराचें प्रमाण कमी करावें लागतें त्यावेळीं मोसंबीच्या रसांतील 'सी' व्हिटॅमिनमुळें फायदा होतो. मोसंबीचा रस काढतांना सालींतील रसद्रव्यें रसांत येतील इतकें पिळूं नये. मोसंबीचा रस घेण्यापूर्वी तो गाळूं नये. कारण मोसंबीच्या गरामध्येंहि खनिज द्रव्यें व व्हिटॅमिन असतात. मोसंबी फळाचा प्रत्येक भाग उपयुक्त असतो हें खालील हकीगतीवरून समजून येईल.

मोसंबीच्या बियांपासून ओलिओ मार्गरीन नांवाचा तेलकट पदार्थ काढतात. याचा उपयोग तेलासारखा करतात. शिवाय एकप्रकारचा रंगहि निघतो त्याचा उपयोग कृत्रिम रेशमास देण्यांत येणारा कोणताहि रंग पक्का करण्याच्या कामीं होतो. सालीवरील रंगित पापुद्र्यापासून एक टरपेनटाईनसारखा पदार्थ निघतो, याचा उपयोग पेंट देण्याच्या रंगांत करतात. शिवाय कॅरोटीन नांवाचें द्रव्य मिळतें व यापासून व्हिटॅमिन 'ए' हें जीवनद्रव्य मिळतें. मोसंबीच्या गरापासून पेक्टीन हें द्रव्य निघतें हें साधारण चिकट असें असतें. याचा उपयोग खोल जखमेवर करतात म्हणजे ती भरूं लागते.

मोसंबीचा गर, साल, बीं, सर्वांचा उपयोग जनावरांचें खाद्य असाहि होतो. गरापासून पेक्टिन काढण्यापूर्वी साल पाण्यानें स्वच्छ धुवावी लागते. या धुवून निघालेल्या पाण्यामध्यें सुमारें १० टक्केपर्यंत साखरेचें प्रमाण असतें. यापासून मोलॅसीस म्हणजे काकवीसारखा पदार्थ मिळतो. अर्थात्, मोठ्या प्रमाणावर जेथें मोसंब्याचा उपयोग करतात तेथेंच हें शक्य आहे, हें उघड होय.

---

**परमाणुशक्ति (अॅटमएनर्जी) पासून विद्युतशक्ति** निर्माण करण्याचे प्रयत्नांमध्यें सध्यां निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें अहमहमिका चालू आहे, असें मि. गायलिओनाल्ड, लंडन येथील सायंटिफिक व इंडस्ट्रियल पत्रकार म्हणतात. उद्योगधंद्याच्या वाढीकरितां, विद्युत्शक्तीची जरूरी सर्व राष्ट्रांना भासत आहे. ब्रिटिश सरकार याकरितां, कंबरलंड कौन्टीमधील स्प्रिंगफिल्ड जवळ कॅल्डरहाल नांवाचें संशोधनकेंद्र उभारीत आहे व येथें विद्युत्शक्ति निर्माण करण्याकरितां परमाणुशक्तीचा उपयोग करण्याचे प्रयोग करण्यांत येणार आहेत, व या प्रयोगाचे निष्पत्तीपासून निर्माण होणाऱ्या विजेचा उपयोग उद्योगधंद्याचे कामीं सन १९६५ पासून सर्वत्र होऊं शकेल, असा कयास आहे.

---

### उंदीर खाऊन पैज जिंकली

ऑस्ट्रियांतील ग्राझ या खेडेगांवांतील जॉन तुग या शेतकऱ्यानें ५ रुपयांची पैज जिंकण्यासाठीं ७ जिवंत उंदीर खाऊन दाखविले. मूक प्राण्यावर अन्याय केल्याबद्दल त्याचेवर नंतर खटला भरण्यांत आला.

---

### अमेरिकन कॉंग्रेस लायब्ररी

अमेरिकेंतील कॉंग्रेसच्या लायब्ररींत एकूण ७ कोटी, १६ लाख, ९२ हजार पुस्तकें आहेत व १ कोटी, ३० लाख हस्तलिखितें आहेत. याशिवाय ४ लाख, १२ हजार रेकॉर्डस आहेत याशिवाय या लायब्ररींत २३ लाख नकाशे आहेत. लायब्ररीचा वार्षिक खर्च ४॥ कोटी रुपये आहे.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००
रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह रु. १,००,०००

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —
लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. १४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

**एक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## आयुर्विम्याच्या व्यवसायावरील उत्कृष्ट ग्रंथ

भारताच्या आर्थिक व सामाजिक जीवनांत आयुर्विम्याच्या व्यवसायाला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. तथापि, ह्या विषयावरील बहुतेक वाङ्मय इंग्रजींत असल्यामुळें जिज्ञासूला अगर भावी विमेदाराला कांहीं माहिती करून घ्यावयाची तर बरीच अडचण पडत असे. श्री. ज. रा. जोशी ह्यांनीं मराठींत ह्या विषयावर एक उत्कृष्ट पुस्तक* लिहून वरील अडचण दूर केली आहे. हें प्रथमच सांगणें आवश्यक आहे.

आयुर्विमा व्यवसाय ज्याच्या सेवेसाठी मुख्यतः चालविण्यांत येतो तो वर्ग म्हटला म्हणजे विमेदारांचा. भारतांत दुर्दैवानें आज अशी परिस्थिति आहे कीं, विमेदारांकडे कित्येक विमा–कंपन्या व त्यांचे एजंट निश्चित व भरपूर दूध देणारी गाय ह्याच केवळ दृष्टीनें पहात असत. अर्थात्, विमा–कायद्यामुळें कंपन्यांवर पडणारी बंधनें ह्या वृत्तीला थोडाबहुत आळा घालतात. ह्याला कारण फक्त कंपन्याच आहेत असेंहि नाहीं. जो मध्यम वर्ग मुख्यतः विम्याचा फायदा घेतो त्याचें अज्ञानहि ह्या बाबतींत अंशतः जबाबदार आहे. प्रस्तुत पुस्तक हें अज्ञान बऱ्याच प्रमाणांत दूर करील ह्यांत शंका नाहीं. पुस्तकाचा उद्देश विम्याच्या धंद्याविषयीं आणि उपयुक्ततेविषयीं सुबोध माहिती देण्याचा आहे आणि तो सर्वांशानें साध्य झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुस्तकाचीं एकूण १६० पृष्ठें असून त्यांची विभागणी १० प्रकरणांत करण्यांत आलेली आहे. दहा प्रकरणांपैकी विमा पॉलिसीच्या शर्ती, पॉलिसीचें बेचन व नॉमिनेशन, पेड–अप, सरेंडर, क्लेम, आणि विम्याची योजना व निवड कशी करावी, हीं चार प्रकरणें संभाव्य विमेदाराच्या दृष्टीनें फार महत्त्वाचीं आहेत. विशेषतः विम्याची योजना व निवड हें प्रकरण अतिशय काळजीपूर्वक वाचण्यासारखें आणि व्यवहाराला धरून असें लिहिलेलें आहे. ह्या प्रकरणाचा विशेष असा सांगतां येईल कीं, व्यक्तींच्या जीवनांतील निरनिराळ्या अवस्थांतराचा सूक्ष्म अभ्यास करून वेगवेगळ्या गरजा भागविण्यास विमा कसा उपयोगी पडूं शकेल हें त्यांत तपशीलवार दाखविण्यांत आलेलें आहे. गरज आणि साधनें ह्यांचा योग्य मेळ घालून विम्यापासून जास्तींत जास्त फायदा कसा घ्यावा ह्यासंबंधीं विचाराची दिशा दाखविणारें, म्हणून हें प्रकरण अतिशय उपयुक्त आहे.

ह्या प्रकरणाच्या बरोबरीनेंच, पण सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विम्याचा विचार करणारें दुसरें उत्कृष्ट प्रकरण म्हणजे ' राष्ट्राच्या उन्नतींतील आयुर्विमा धंद्याचें स्थान ' हें होय. हें प्रकरण अवघें साडेचार पृष्ठांचेंच आहे. पण त्यांत, बचत करण्याचें महत्त्व आणि ती गुंतविण्याची योग्य दिशा ह्यासंबंधीं थोडक्यांत सुबोध विवेचन केलेलें आहे. भारत स्वतंत्र झाल्यापासून देशांतील दारिद्र्य दूर करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. आर्थिक विकासाच्या पंचवार्षिक योजना आतां सर्वतोमुखी झाल्या आहेत. ' ह्या दारिद्र्य विमोचनाच्या कामांत विमा–कंपन्यांजवळील निधीचा उपयोग करतां येईल असें पुष्कळदां सांगितलें जातें. कांहीं प्रमाणांत हें खरें असलें, तरी ह्या निधीच्या उपयुक्त वापराला मर्यादा कशा पडतात हें प्रस्तुत प्रकरणांत दाखविण्यांत आलें आहे. हें प्रकरण आणखी विस्तृतपणें लिहिलें गेलें असतें तर बरें झालें असतें.

अखेरचें प्रकरण पुस्तकाचें सार प्रश्नोत्तर रूपानें सांगणारें आहे. विमा, बँकिंग, अशासारख्या रुक्ष आर्थिक विषयावरील वाङ्मय मराठींत असलें तरीसुद्धां किती वाचक तें आवडीनें वाचतात हा प्रश्नच आहे. मनोरंजनापलीकडे जाऊन शास्त्रीय विषयांचा अभ्यास करण्याची वृत्ति सामान्यतः विरळाच असते. पण आयुर्विमा ही बाब अशी आहे कीं, तिचा संबंध मध्यमवर्गीयांच्या जीवनाशीं फार निकटचा आहे. म्हणून, ह्या वर्गानें निदान शेवटचें प्रकरण तरी स्वहिताच्या दृष्टीनें जरूर वाचावें; एकंदरीनें सर्व पुस्तक माहितीनें परिपूर्ण आणि सुगम असें आहे. श्री. जोशी ह्यांनीं विम्यासारखा विषय सामान्य वाचकाला समजून देण्यासाठी केलेला हा प्रयत्न संपूर्णतया यशस्वी झालेला आहे. मराठींतील अर्थविषयक वाङ्मयांत त्यांनीं ही मोलाची भर घातली आहे ह्यांत शंका नाहीं.

* " तुमचा विमा ". लेखक : ज. रा. जोशी, एम. एस्सी., एफ. आय. ए., डेप्युटि ॲक्चुअरी, वेस्टर्न इंडिया विमा कं. लि., सातारा. प्रकाशक : नवीन किताबखाना, पुणें २–मुंबई ४. पृ. सं. १६३ किं. दोन रुपये.

---

## सहकारी कारखान्यांबाबत सरकारच्या अटी

सहकारी साखरकारखान्यांबाबत मुंबई सरकारनें खालीलप्रमाणें निर्णय घेतला आहे, असें समजतें:—

स्थानिक परिस्थितीप्रमाणें कारखान्यांची जागा तपशीलवार चौकशी करून निश्चित केली जाईल. कारखान्याला लागणारा ऊंस त्याच्या क्षेत्रांतील शेतकऱ्यांकडून मिळाला पाहिजे. कारखान्यांत बसविण्याची यंत्रसामुग्री किमान ६०० ते ८०० टनांची व कमाल ८०० ते १,००० टनांचीं पाहिजे. १० लाखांच्या रिडीमेबल भाग भांडवलापलीकडे सोसायटीचे भाग सरकार घेणार नाहीं; मग कारखान्याचा आकार केवढाहि असो. ६०० ते ८०० टनांच्या कारखान्यासाठी किमान १५ लाख रुपयांचें व ८०० ते १,००० टनांच्या कारखान्यासाठी किमान २० लाख रुपयांचें भांडवल जमविण्यांत आलें पाहिजे. उसाच्या लागवडीसाठी किमान २० लाख रुपयांचें भांडवल जमविण्यांत आलें पाहिजे. उसाच्या लागवडीसाठी लागणारें मोसमी भांडवल व चालू व्यवहारासाठी आवश्यक तें भांडवल मध्यवर्ती जिल्हा बँकांनीं पुरविण्याचें आहे. जिल्हा बँक देऊं शकत नसेल, तर मुंबई राज्य सहकारी बँकेनें तें द्यावयाचें आहे. लँड मॉर्गेज बँकेनें ऊंस शेतकऱ्यांना भागभांडवलांत पैसे गुंतविण्यासाठी कर्ज देतां कामा नये. सहकारी कारखान्याला तिच्या व्यवहारक्षेत्राबाहेरील लोकांना भागीदार करून घेतां येणार नाहीं. कोणाहि एकाला २५,००० रु. पेक्षा जास्त किंमतीचे भाग घेतां येणार नाहींत. कोणत्याहि व्यक्तिशः सभासदाचा २५ पेक्षा जास्त एकरांतील ऊंस घेण्यास सोसायटी बांधलेली रहाणार नाहीं.

---

## पश्चिम बंगालमधील बँकांच्या लिक्विडेशनचें काम

भारत सरकारनें बँकिंग कंपन्यांच्या दुरुस्त कायद्याप्रमाणें कोर्ट-लिक्विडेटर नेमला होता, त्यानें पश्चिम बंगालमधील ६६ बँकांचा ताबा घेतला आहे. ह्या बँकांच्या लिक्विडेशनचें काम त्याच्या नेमणुकीचे वेळीं चालू होतें. गेल्या वर्षी कायदा दुरुस्त केला, त्यावेळीं त्यांत एक महत्त्वाची सुधारणा करण्यांत आली. ती म्हणजे बँक लिक्विडेशनमध्यें गेली, म्हणजे प्रत्येक सेव्हिंग्ज खातेदाराला १०० रुपयांपर्यंत त्याच्या खात्यांतील रक्कम इतरांचे अगोदर मिळावी. लिक्विडेशनच्या खर्चांत काटकसर व्हावी, ह्यासाठी लिक्विडेशनमध्यें गेलेल्या सर्व बँकांचे कागदपत्र एकाच मध्यवर्ती ठिकाणीं कलकत्ता नॅशनल बँक कचेरींत आणण्यांत आले आहेत. त्यामुळें, घरभाडें, गोडाऊनभाडें, नोकरांचे पगार ह्यांत बचत झाली आहे. वकिलीखर्चहि कमी करण्याचा यत्न चालू आहे.

## सहकारी बँकांचे अहवाल

(मागील अंकावरून पुढें चालू)

**१० श्री कोरेगांव को. पीपल्स बँक लि., कोरेगांव**

४३५ सभासद, भाग भांडवल ६५,९०० रु. रिझर्व्ह फंड, २०,७७३ रु. इतर फंड, २०,९५१ रु. ठेवी ३,१४,५० रु. अहवाल वर्षी ठेवींत ९८,५३२ रु. ची वाढ. होम सेव्हिंग्ज स्कीमची नवीन योजना. एकूण कर्ज येणें, २,१२,०६८ रु. वे. इंडिया विमा कंपनीचे हप्ते भरण्याची सोय. रौप्यमहोत्सव साजरा होणार. नफा, ७,९१८ रु. डिव्हिडंड, ५½% (प्रेसिडेंट: गजानन अनंत भंडारे. चेअरमन: गणेश रामचंद्र कुलकर्णी. मॅ. डायरेक्टर: शंकर रामचंद्र बोकील.)

**१९ दि इस्लामपूर को. पीपल्स बँक लि.**

५१२ सभासद. शेअर भांडवल, ३५,१७० रु. रिझर्व्ह फंड, १५,०९७ रु. इतर फंड, १४,३१४ रु. येणें कर्ज, १,२९,७१८ रु. बँकेचा व्यवहार वाढत आहे. नफा, २,२३२ रु. डिव्हिडंड ४% (चेअरमन: एम. डी. पवार. मॅनेजर: डी. डी. लाटकर).

**२० द. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली**

११२४ 'अ' वर्गीय सभासद. (२७८ सोसायट्या व ८४६ व्यक्तिशः) ठेवींत ९० हजारांची वाढ ३,०४,६३० रु. वसूल भांडवल. १,७१,५२५ रु. फंड. २०,३८,८७८ रु. ठेवी. खेळत्या भांडवलांत ३½ लाखांची वाढ. थक बाकीचें प्रमाण कमी झालें आहे. सहकारी सोसायट्यांना कर्जे १२,३९,४०३ रु. व्यक्तिशः सभासदांना ३,३९,९८३ रु. नफा, १४,३९८ रु. डिव्हिडंड ३½% (चेअरमन: रा. बा. आरवाडे, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर: वाय. एस. बोरगांवकर, बी. ए., बी. कॉम).

**२१ दि बलभीम को. बँक लि., कोल्हापूर**

सभासद संख्या १३७६. शेअर भांडवल ७३,६४० रु. ठेवी ३,८२,०१२ रु. खेळतें भांडवल ५,८५,३३३ रु. फंडस १,११,८६९ रु. ठेवींत १२,००० रुपयांची वाढ. सामान्य कर्जे येणें ३,९४,२०४ रु. नफा ६,३१८ रु. डिव्हिडंड ६¼% बँकेचें समाज कार्य महत्त्वाचें आहे. उदाहरणार्थ, शिक्षण फंडांतून मदत, मेडिकल उपकरणांची सोय, नांगर, पावडर, पंप, इत्यादींची व्यवस्था, प्रथमोपचाराची बॉक्स, स्प्रेपंप, कै. गु. श्रीपतराव शिंदे वाचनालय, बँकेच्या हॉलमध्यें रेडिओ, देवी टोचण्याचें केंद्र, इ. "कोल्हापूर जिल्ह्यांतील सर्व बँकांमध्यें सभासदांच्या शैक्षणिक, सामाजिक वगैरे बाबींकडे व इतर गरजा व आरोग्य यांकडेहि लक्ष पुरविणारी बँक आपली बँक मुंबई जिल्ह्यांत एवढी एकच असेल, असें आम्हीं अभिमानानें म्हणतों."—डायरेक्टरांचा अहवाल. (प्रेसिडेंट: दत्तात्रय चंद्रोबा पाटील. मॅनेजर: दि. बा. सरनाईक.)

**२२ धुळें अर्बन को-बँक लि.**

१४९० सभासद. १,४३,२७५ रु. शेअर भांडवल. १,२३,९१५ रु. रिझर्व्ह फंड. ९०,१६२ रु. इतर फंड. ५,१७,९२६ रु. ठेवी. ५,७२,५४२ रु. दिलेलीं कर्जे ४,०७० रु. नफा. ३½% डिव्हिडंड. (चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर: शंकर शालू बडगुजर. मॅ. डायरेक्टर: नथू सखाराम पाटील.)

**२३ दि बॉंबे प्रॉ. को. लँड मार्गेज बँक लि.**

अहवालाचे वर्षी १२½ लक्ष रु. ची नवीं कर्जे देण्यांत आली. एकूण येणें कर्ज ८३ लक्ष रु. आहे. तोटा: ४५,५८० रु. गेल्या वर्षीचा तोटा: ३१,२५२ रु. प्राथमिक बँकांकडील: येण्याची वसुली समाधानकारक नाहीं.

**दि बॉम्बे स्टेट कंझुमर्स को. सोसायटी लि.**

वसूल भांडवल ८,०७,७१० रु. रिझर्व्ह व तरतुदी ३,२१,१५४ रु. घेतलेली कर्जे १३,६५,९७१ रु. इतर देणीं ३,२७,७०७ रु. स्टॉक इनट्रेड १९,२९,५७२ रु. वर्षातील व्यवहारामधील तोटा २,१५,७१६ रु. शिलकी तोटा, ६,२०,७९२. एकूण तोटा ८,३०,५०९ रु. वर्षातील विक्री ६०,८३,७२९ रु. गेल्या वर्षीच्या मानानें विक्रींत २७ लक्षांची घट. एकूण विक्रींत सभासदांचा वांटा २४% विकला न जाणारा १४ लाखांचा माल ४ लाख रु. तोटा सोसून विकून टाकला. ४७ शाखांपैकी १९ शाखा अहवालाचे वर्षी बंद केल्या. शिलकी साठा गेल्या वर्षी ३८ लक्षांचा होता, तो आतां १९½ लाखांवर आणला. त्यामुळें व्याजाची बचत. सरकारनें कर्जावरील व्याजाचा दर कमी करावा व कांहीं कर्जे देणगी देऊन रद्द करून टाकावें, अशी खटपट चालू आहे. अहवालाचे वर्षांत मागीदारांनीं ८६,००० रु. चें शेअर भांडवल परत घेतलें. मोठ्या शहरांतील मोठे स्टोअर्सच फायदेशीर ठरतात, असा अनुभव आहे. घाऊक व्यापार वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. आयात मालाची विक्री वाढवून सभासदांना तो योग्य किंमतीस देण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे. सरकारनें आपली कांहीं खरेदी सोसायटीमार्फत करावी, ह्यासाठीं खटपट करण्यांत येईल. (प्रेसिडेंट: वाय. बी. चव्हाण, पुरवठामंत्री, मुंबई. चेअरमन: आर. एन. समर्थ, बी, ए., ऑक्सफर्ड. ऑ. सेक्रेटरी: बी. ए., कुरेशी बी. ए., एलएल. बी.)

---

**समाजविकास योजना (प. खा. जिल्हा)**
**सहकारी शिक्षणवर्ग**

शहादें (प. खा.) येथें नुकताच एक रिफ्रेशर क्लास घेणेंत आला होता. समाजविकास योजनेंत काम करणारे सर्व ग्रामसेवक, २० तलाठी व सहकारी सोसायट्यांचे ३२ सेक्रेटरी मिळून एकूण ६० इसमांनीं सदर क्लासचा फायदा घेतला. क्लासचें उद्घाटन समाजविकास योजनाधिकारी श्री. चव्हाणसाहेब यांनीं केलें. डॉ. वि. ह. पाटील, मे. असिस्टंट रजिस्ट्रार, मे. असि. प्रॉजेक्ट ऑफिसर, मे. मामलेदार श्री. शंकरभाई श्री. बोंदर्डे इत्यादि सद्गृहस्थांनीं क्लासांत उपयुक्त माहिती दिली. श्री. मा. बा. जोशी, को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर धुळें यांनीं सर्वांच्या सहकार्यानें सदरचा क्लास उत्तम रीतीनें चालविला. अशा रीतीनें भरविलेला हा पहिलाच क्लास होय.


**"अर्था"चा दिवाळी अंक**

तज्ज्ञांचे लेख व आर्थिक महत्त्वाची माहिती एकत्र देणारा "अर्था"चा दिवाळी अंक नेहेमीप्रमाणें प्रसिद्ध होईल.


**हितचिंतक जाहिरातदारांनीं आपल्या जाहिराती सत्वर पाठवाव्या.**

"अर्था"चा दि. १० चा अंक बंद राहील.



**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



श्री. मोतिराम नारायण
पाटसकर



पाटसकर फर्मचे संस्थापक
कै. श्री. नारायण नामदेव पाटसकर



कै. पंढरिनाथ नारायण
पाटसकर

# ✢ मेसर्स पाटसकर कंपनीचा ७५ वा वाढदिवस ✢

मेसर्स पाटसकर कंपनीचा ७५ वा वाढदिवस पानसुपारी-समारंभ श्री. मो. ना. पाटसकर यांनीं नुकताच ता. १४ ऑगष्ट १९५४ रोजीं साजरा केला. याप्रसंगीं महर्षी अण्णासाहेब कर्वे, रँग्लर परांजपे, प्रि. धनंजयराव गाडगीळ, केसरीचे संपादक श्री. जयंतराव टिळक, श्री. दा. वि. गोखले, नामदार एन्. व्ही. गाडगीळ, श्री. शंतनुराव किर्लोस्कर, महर्षी लक्ष्मणराव किर्लोस्कर, श्रीमंत व सौ. रास्ते, वगैरे अनेक जुनी-नवी आश्रयदाती १५०० शें वर ग्राहक मंडळी आशिर्वाद देण्यास उपस्थित होती.

शके १८०१, इ. सन १८७९ सालीं श्री. मोतीराम शेट यांचे वडील कै. नारायण नामदेवशेट पाटसकर हे या कंपनीचे संस्थापक होत. अवघ्या १९ वर्षांत या दुकानची सर्वप्रकारें भरभराट झाल्यानें सन १८९८ सालीं या व्यवसायास सर्वप्रकारें आधुनिक सोयींनीं युक्त अशी इमारत पुणें पेठ नागेश येथें बांधण्यांत आल्यावर या नवीन इमारतींत व्यापार-उद्योग सुरू केला. पुणें शहरांत पाश्चिमात्य पद्धतीचे कपडे वक्तशीर शिवून देणारे आणि कपडे तयार करून विक्री करण्याचे आद्य प्रवर्तक कै. ना. ना. पाटसकर यांना समजण्यांत येतें. महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध शिवण-व्यावसायिक म्हणून पाटसकर कंपनीचा लौकिक कायम आहे.

सन १९३० मध्यें श्री. मोतीरामशेट यांनीं डेक्कन जिमखान्यावर नवीन दुकान सुरू केलें. त्यानंतर गेल्या २५ वर्षांत त्यांनीं आपल्या मूळच्या उद्योगधंद्याची अनेकप्रकारें वाढ केली. त्यांचीं पुण्यास ५ दुकानें, शिवाय सांगली, सातारा, कऱ्हाड येथेंहि शाखा आहेत. श्री. मोतीरामशेटनीं सन १९४९ सालीं भारतीय उषा शिवणयंत्रांची पुणें, द. सातारा, उ. सातारा जिल्ह्यांची सोल एजन्सी मिळविली असून उषायंत्रें विक्रीचा व्यवहार उत्कृष्ट प्रकारें चालविला आहे.

शिवणकर्तनाचे ज्ञानार्जन करणेकरितां त्यांनीं भारत आणि उषा शिवणकर्तन विद्यालय या दोन संस्था गेल्या कित्येक वर्षांपासून चालविल्या असून त्या सरकारमान्य आहेत. गेल्या २५ वर्षांमध्यें त्यांनीं शेंकडों स्त्री-पुरुषांना कलेचें ज्ञानार्जन करून उद्योगास लाविलें आहे. सुमारें २०० वर विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांनीं या कलेचें मोफत शिक्षण दिलें आहे.

सन १९५३ सालीं त्यांनीं युरोप, अमेरिकेचा दौरा करून तेथील शेंकडों शिवणकर्तन संस्थांना भेटी दिल्या. अनेक तयार कपड्यांच्या कारखान्यांची पहाणी केली. इंग्लंड, अमेरिका, जर्मनींतील जगविख्यात संस्थांच्या या कलेच्या परीक्षा देऊन प्रथमश्रेणींत यश संपादन करून डिप्लोमा मिळविले आहेत. श्री. मो. ना. पाटसकर यांचे संग्रहीं (पुरुषांचे) शिवणकर्तन विषयाचीं गेल्या ७५ वर्षांपासूनचीं पुस्तकें आहेत. त्यांचेइतका या विषयांतील मोठा पुस्तकसंग्रह अखिल जगांत फार तर ३।४ ठिकाणीं आहे असें म्हणतात.

श्री. मो. ना. पाटसकर यांची मुंबई, तसेच मध्यवर्ति सरकारनें निरनिराळ्या शिवणकर्तनाचे औद्योगिक समित्यांवर एक तज्ज्ञ व सल्लागार म्हणून गेल्या कांहीं वर्षांपासून नेमणूक केली आहे. श्री. मो. ना. पाटसकर यांनीं गेल्या ५ वर्षांत शिवणकर्तन कलेवर मराठी व हिंदीमधून ५ पुस्तकें प्रकाशित केलीं असून सर्व पुस्तकांच्या द्वितीय आवृत्या नुकत्याच प्रसिद्ध झाल्या आहेत. इंग्रजी आवृत्तीचें काम चालू आहे. याशिवाय "व्यापारी शिंपी" नामें द्वैमासिक त्यांनीं सन १९५० सालापासून चालविलें आहे.

श्री. मोतीरामशेट यांचे वडील बंधू कै. पंढरीनाथ ना. पाटसकर हे जुन्या पिढींतील सहकारी चळवळींतील एक प्रसिद्ध कार्यकर्ते होऊन गेले. ते पुणें सेंट्रल को. बँक व पुणें मर्चंटस् को. बँकेच्या संस्थापकांपैकीं एक आहेत. त्याचप्रमाणें या दोन्ही बँकांचे ते प्रारंभीं डायरेक्टर होते. पुणें मर्चंटस् को. बँकेच्या पहिल्या वर्षाचें चेअरमनपद त्यांनींच भूषविलें आहे.

सध्यांचे पाटसकर कंपनीचे मालक श्री. मोतीरामशेट हे आपल्या बंधूप्रमाणेंच गेलीं २० वर्षें अनेक सार्वजनिक संस्थांमधून कार्य करीत असून पुणें सेंट्रल को. बँक, पुणें जिल्हा लँड मॉर्गेज बँक, पुणें अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ, पुणें मर्चंट टेलर्स को. असोसिएशन या संस्थांवर डायरेक्टर म्हणून काम केलें आहे. पुणें अर्बन को. बँकेचे ते सतत ९ वर्षें चेअरमन आणि पुणें सेंट्रल को. बँकेचें एक वर्ष व्हाईस चेअरमन होते. हल्लीं पुणें अर्बन को. बँकेचे प्रेसिडेंट आहेत. याशिवाय सरकारतर्फें श्रीराममंदिर संस्थान आळंदी या संस्थेचे सरकारतर्फें ट्रस्टी आहेत.

श्री. मो. ना. पाटसकर यांचे चिरंजीव श्री. दत्तात्रय आणि प्रभाकरपंत यांनीं त्यांचे उद्योगधंद्यांतील कार्याचा मोठा भाग हल्लीं संभाळल्यामुळें त्यांना सार्वजनिक कार्यास अधिकाधिक वेळ मिळेल असें वाटतें.

अशा प्रकारें आपल्या उद्योगव्यवसायाची सर्वतोपरीं वाढ करून वाडवडिलार्जित लौकिकांत भर टाकून सार्वजनिक कार्यांतहि मानाचें स्थान मिळविलेल्या श्री. मोतिरामशेट यांचे, त्यांचे दुकानचें ७५ वें वाढदिवसानिमित्त आम्हीं अभिनंदन करतों व त्यांच्या सर्वांगीण कार्यास सुयश चिंतितों.

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय

### प्राथमिक शेती व बागाईत शाळेस मंत्री व उपमंत्री यांची भेट व प्रोत्साहन

महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयानें एरंडवणा उद्यानांत शेती व बागाईत कामाचें प्राथमिक शिक्षण देण्याची शाळा चालविली. या ठिकाणीं सुमारें १००–१२५ विद्यार्थी शेती–भाजीपाला लागवड, इत्यादि कामें करावयास शिकत असतात. या कामासाठी सर सासून डेव्हिड ट्रस्ट फंडांतून रु. २,५०० ची देणगी संस्थेस मिळूं लागली आहे. या विद्यार्थ्यांमध्यें ट्रेनिंग कॉलेजमधील सुमारें ४० विद्यार्थी काम शिकत आहेत. जीं कामें व जे अभ्यास विद्यार्थ्यांस शिकविण्यांत येतात, तशाच अभ्यासक्रमास सर सासून डेव्हिड ट्रस्ट फंडानें मान्यता दिली आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास सुमारें ४५ चौ. फू. वाफा प्रत्यक्ष काम करण्यासाठी देण्यांत आला आहे व असे १४० वाफे भाज्यापाले लावून तयार झाले आहेत. सत्कार–समारंभानिमित्त एरंडवणा उद्यानांत आलेल्या अनेक स्त्री-पुरुषांनीं हीं कामें पाहिलीं. मुख्य मंत्री श्री. मुरारजीभाई, मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे व श्री. मालोजीराव निंबाळकर यांनीं प्रत्यक्ष कामें पाहून विद्यार्थ्यांची विचारपूस केली. त्यावेळीं कौन्सिलचे अध्यक्ष श्री. हुक्केरीकर, उपाध्यक्ष श्री. लिमये, उपमंत्री श्री. व्ही. के. साठे, श्री. मुस्ताफा फकी, श्रीमती इंदुमती सेठ, श्री. बी. डी. देशमुख, श्री. जत्ती, अशा सर्व मंत्री व उपमंत्रीमहाशयांनीं व कित्येक सरकारी अधिकाऱ्यांनीं संस्थेचा हा विभाग पाहिला. याचवेळीं पुणें महानगरपालिकेच्या कित्येक सभासदांनींहि या प्रात्यक्षिकांचें अवलोकन केलें. श्री. बाबूराव सणस, श्री. नलावडे, श्री. वसंतराव देशमुख, श्री. तुळशीबागवाले, आदिकरून सदस्यांनीं या दैनंदिन जीवनाशीं संबंध पोंचविणाऱ्या संग्रहालयाच्या कामाची प्रशंसा केली. म्युनिसिपल कमिशनर व सन्माननीय मेयॉर यांनीं मंत्री व उपमंत्री यांचेकरितां मार्गदर्शन केलें.

---

## दि कॉसमॉस को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

### नवे पदाधिकारी

**१. सल्लागार मंडळः**—१. मा. ग. न. जेजुरीकर, अध्यक्ष. २. मा. दा. मो. मोघे, उपाध्यक्ष. ३ मा. गो. शं. देशमुख, डी. सी. इ., एल. एस. जी. डी. ४. मा. चिं. वा. भट, बी. ए., एलएल. बी, ५. मा. शा. रं. साळवेकर, वा. वि. व्या. वि (टि. म. वि.)

**कार्यकारी मंडळः**—१. मा. पां. रा. देव, कॉन्ट्रॅक्टर, कार्याध्यक्ष. २. मा. द. ल. पारखी, वकील, उप–कार्याध्यक्ष. ३. मा. ग. या. नातू, एम्. ए. ४. मा. य. बा. देहाडराय, बी. ए., बी. टी. ५. मा. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल बी., ६. मा. वि. ल. हर्डीकर, जी. डी. कॉम. ७. मा. वा. रा. होनप, एम्. ए., एलएल. बी. ८. मा. डॉ. न. का. घारपुरे, एम्. ए., एलएल. बी., पीएच. डी. ९. मा. प. श्री. आगाशे. १० मा. वा. म. लेले. ११ मा. मो. पां. देशपांडे.

**स्थानिक आयव्यय निरीक्षकः**—१. मा. रा. कृ. देशपांडे बी. ए., बी. कॉम., बी. टी. २. मा. व. का. साठे, बी. ए., बी. कॉम.

---

**शिक्षणाधिकाऱ्याचा दौरा**—भारतीय सरकारचे शैक्षणिक सल्लागार श्री. सैय्यदैन ह्यांना अमेरिकेंतील रॉकफेलर फौंडेशनकडून व्याख्यानें देण्याचें आमंत्रण आलें आहे. अमेरिकेंतील विद्यापीठांतून 'शिक्षण आणि संस्कृति' ह्या विषयांवर व्याख्यानें देण्यासाठी ते जाणार आहेत.

## कोपरगांव सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीच्या शिक्षण-वर्गाच्या परीक्षेचा रिझल्ट

गेल्या जून १९५४ मध्यें कोपरगांव येथें झालेल्या सोसायट्यांच्या सेक्रेटरीच्या परीक्षेंत खालील ३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

पहिला वर्गः—इ. पी. टेके के. डी. पोंडागळे, एस्. एम्. घोगरे डी. एस्. लिंगे.

दुसरा वर्गः—बी. जी. आमकर एस्. बी. खंडागळे, एस. आर. काळे, बी. एन्. आरादे, बी. डब्लु. लचुरे, एन्. टी. साळुंके, डी. जी. जाधव, बी. बी. औताडे, जी. डी. राटने, एन् आर. वाणी, पी. आर. कदम, एम्. डी. एकबोटे, आर. बी. आहेर, बी. डी. आढाव.

तिसरा वर्ग—के. एम् गायकवाड, ए. ए. टाकळकर, के. ए. कुलकर्णी, यू. ए. पठाण, पी. पी. जोशी, एफ्. एच्. कुलकर्णी, बी. एस्. बारसे, जे एम्. म्हसे, आर. एस. पाठक, एस्. जी. सावळे, पी. एस्. उगले, एम्. एस्. जोशी, बी. एम्. कोरडे, एन्. एस्. वाणी, के. डी. खिलारे एल्. डी. मार्डीवाले, के. जी. डांगे.

---

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, राहुरी

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें चालविल्या जात असलेल्या सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास मुक्काम राहुरी येथें ता. २० ऑक्टोबर, १९५४ पासून ६ आठवडे पर्यंत चालविण्याचें नगर जिल्हा सहकारी बोर्डानें ठरविलें आहे. तरी गरजूंनीं ह्या वर्गाचा अवश्य फायदा घ्यावा, असें बोर्डाचे सेक्रेटरी कळवितात.

---

### फोर्ड मोटार कंपनीचा व्याप

फोर्ड मोटार कंपनीच्या मोटारींची वार्षिक विक्री २,००० कोटी रुपयांची होत असून कंपनीस कर वजा जातां दरमहा ७॥ कोट रुपयांचा नफा होतो. या कंपनीचें भागभांडवल ६२५ कोटी रुपयांचें असून गतवर्षी ९० कोटी रुपयांचा नफा या कंपनीस झाला. युद्धसमाप्तिनंतर एकूण ७५० कोटी रुपयांचा नफा या कंपनीस झाला आहे. मोटारींच्या निरनिराळया कंपन्यांमध्यें फोर्ड मोटारींचा खप सर्वात जास्त आहे.

---

### औद्योगिक उत्पादनाच्या वाढीची गति

भारतांतील औद्योगिक उत्पादन १९५० पासून एकसारखें वाढत आहे. पण वाढीची गति मात्र हळुहळु मंदावत आहे. १९५१ मध्यें ११·६%, १९५२ मध्यें १०% आणि १९५३ मध्यें ५% वाढ झाली. १९५३ च्या मानानें १९५४ मध्यें ३% वाढ होईल अशी अपेक्षा आहे. कपास कापड, सिमेंट, अन्नधान्यें, ह्यांच्या उत्पादनाची प्रगति समाधानकारक आहे.

---

### सोलापूर जिल्हा सहकारी बोर्ड, लि.

सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग ता. ४-१०-५४ ते २०–११–५४ पर्यंत मंगळवेढा येथें चालणार आहे.

---

**वाया चाललेल्या सामुग्रीचा उपयोग**—सिंद्री येथील खताच्या कारखान्यांतील वाया जाणाऱ्या पदार्थांचा उपयोग करून असोसिएटेड सिमेंट कंपनी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत १ कोटी टन सिमेंट निर्माण करणार आहे. सिमेंटचा धंदा भारतांत सुरू करणारी ही पहिली कंपनी असून ह्या बाबतींतील तिचा अनुभव फार मोठा आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.